# संजय गोडघाटे यांच्या समग्र कवितेतील आंबेडकरी जाणिवा

**मुन्ना रेवचंद नंदागवळी**
(संशोधक विद्यार्थी)
गोविंदराव वारजूकर कला व वाणिज्य महाविद्यालय,
नागभीड, जि. चंद्रपूर, गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.
भ्रमणध्वनी : ९७६४६७६४९९
संकेतस्थळ :
munnabhai.swarkavya@gmail.com

**प्रा. डॉ. अनमोल शेंडे**
(संशोधक मार्गदर्शक)
गोविंदराव वारजूकर कला व वाणिज्य महाविद्यालय,
नागभीड, जि. चंद्रपूर, गोंडवाना विद्यापीठ,
गडचिरोली.
संकेतस्थळ : shendeanmol@gmail.com

---

***सारांश :***

*कवीने समग्र चारही कवितासंग्रहामध्ये वास्तववादी जगणे, प्रत्ययदर्शी आलेला अनुभव, समोर आलेल्या परिस्थितीवर मात करून स्वतःच्या शब्दांनी कवितेला कवितेला बांधून महामानवाचे विचार पेरणी करीत असल्याचे प्रासंगिक चित्र रेखाटले आहे.*

---

**प्रस्तावना :**

संजय गोडघाटे हे मराठीतील एक वेगळी ओळख निर्माण करणारे वास्तववादी कवी आहे. पूर्वविदर्भाच्या मातीचा सुगंध देवून सपूर्ण महाराष्ट्राच्या मातीमध्ये आपल्या शब्दांचे भरघोष पीक मिळवणारा हा कवी आहे. कविता हा स्थायीभाव असताना सामाजिक कार्य हे हाती घेऊन समाजाच ऋण पेडणारा व्यकिमत्व आहे. मराठी कवितेला आंबेडकरी कवितांचे स्वरूप प्राप्त करून देणारा सभ्य माणूस आहे. संसाराला जसे गैस सिलेंडर पूरवून आपला पोटाचा प्रश्न सोडवतो. तसाच आंबेडकरी समाजाला स्वत:च्या कवितेने जागृत करतांना दिसतो. या कवीच्या कविता समाजाला प्रबोधनाचे डोज पाजून बळकट करण्याचे काम करतो.

संजय गोडघाटे यानी आंबेडकरवादी समग्र जाणिवा बरोबरच कवितेचा चंग चांगलाच बांधला. आपल्या कविता लेखनातून डॉ. बाबासाहेव आंबेडकरांच्या विचाराची पेरणी प्रामुख्याने केली आहे. 'वादळ' (2010), 'लढा सुरूच ठेवावा लागेल' (25 डिसेंबर 2012), 'अस्वस्थ काळ आणि माणूस' (16 सप्टेंबर 2016), 'हे असेच होत राहिले तर' (30 आक्टोबर 2021) चार कवितासंग्रह प्रकाशित आहेत. हे संग्रह वाचकांना आंबेडकरी प्रेरणेच्या जाणिवा प्रसार करीत आहेत. खऱ्या अर्थाने आंबेडकरवादी कवी आहेत. यात शंका नाही. संजय गोडघाटे यांनी लहान वयापासून परिस्तिथीशी झुंज केली. या परिस्तिथीला पर्याय म्हणून अनेक महापुरुषांचे चरित्र डोळ्यासमोर ठेवून आंबेडकरी निष्ठा व तत्त्वज्ञान जोपासले आहे. लोकांच्या गर्दीत माणूस शोधणे हे वीचे कार्य दिसून येते. मनुवादी वादळाला थांबविण्याची ताकद कवीने कविनन निमणि केली आहे. संजय गोडघाटे हे कामगारांचे प्रतिभावान तेजस्वी रूप आहे.

**संजय गोडघाटे यांची कविता समजून घेताना :**

संजय गोडघाटे हे कवी स्वातंत्र्यरीत्या जगण्याची फार तळमळ आहे. पण आजच्या काळ हा अत्यंत संवेदनशील आहे. समाजात दररोज घडणाऱ्या घटना, देशातील अनेक अमानुषपणे होणारे अत्याचार, धर्माच्या नावाखाली होणारे दंगे, राजकारण अशाप्रकाराने कवीचे मन एकदम व्याकुळ होताना दिसतो. हा काळ अस्वस्थ आहे. सामंजश्याचे जीवन या काळात जगता येणे कठिण वाटत आहे. काय करावे ? काय करू नये ? असे प्रश्न कवीच्या डोळ्यासमोर असतात. भारतात तर सध्या बेरोजगारी 83 टक्के प्रदान झाली आहे. "माणसाला जगण्याचे, वागण्याचे, बोलणे असे असे संविधानीक निसर्गतः मोकळीक हवी आहे. सदर सर्व प्रकारचे स्वातंत्र भारतीय संविधानाने प्रत्येकालाच बहाल करी. सविधान हे माणसाला एका व्याय देवू शकतो, वाचवू शकतो."[1] अश्या कवयित्री उषाकिरण आत्राम म्हणतात.

"मुक्याची तू वाचा होता
आंधळ्याची काठी
सुखामधी-दुःखामधी
तुझा हात पाठी
रित्या केल्या जीवनात
सुखाच्या पखाली..."[2]

18 व्या शतकात दलित, शोषित व वंचित वर्ग हा तोंड असून बोलू शकत नव्हता. बोलण्याची परवानगी वा उजागरच नव्हती, बाबासाहेब यांना उद्देशून आंधळ्यांची काठी होऊन तू आमच्या सुखदु:खामध्ये खंबीर सहभागी होता. परिस्थितीशी लढायला तु आमच्या पाठीवर हात ठेवून आधार देत जीवनात आमच्या सुखाची पाली निर्माण केलेस असे कवी म्हणतात.

"मला जात-पात माहीत नाही
कोणताही धर्म माहीत नाही
मी माणूस आहे माणूस
छाती ठोकून सांगावे.."[3]

मी सामान्य माणूस म्हणून जन्मास आलो आहे, जन्म झाला तेव्हा मला जात-पात, धर्म ह्या बाबी माहित नव्हते, जातीच्या-धर्माच्या विळख्यात मला बांधू नका, माणूस म्हणून जगू दया, माणूसच आहे हे निधळ्या छातीने ठोकून सांगतोय असे कवी या कवितेत म्हणतात.

"तू आमच्या वस्तीत यायलाच
पाहिजे महासूर्या
अंधारात राहून राहून
डोळ्यांच्या बुबुळांत
काळे डाग पडलेत

अंधारयुगच वाहायला
लागलंय पापण्याआड..."[4]

आमच्या जीवनात दोन सूर्य आहेत. एक सृष्टीवरील प्राणीमात्रांना उजेड दयायला, तर दुसरे म्हणजे आमच्या अंधारलेल्या जीवनाला प्रकाशमय करून जीवन फुलविणारे प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच आहेत. अंधारात राहून जीवनच अंधामय रात्री पाहून डोळ्यांचे भाग काळेसर झालेले आहे. अशाने नुसते आम्ही अंधा-या जीवनात जगत असल्यासारखे वाटते. असे कवी या कवितेत म्हणतात.

"बाबू हरदास एल. एन.
तुम्ही म्हणाले,
जय भीम म्हण !
ध्यास घेतला
शब्द पावला
जय भीमसाठी जीव त्यागला
मरण पत्करले जय भीम !
सजवून ओठावरी" [5]

जयभीम या जयघोषाचे जनक बाबू हरदास यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवंतपणी जयभीम हे सन्मान देण्याचे नमन करण्याचे व वंदन करण्याचे आम्हासाठी अलौकिक शब्द निर्माण करुन प्रयोग केले. आज आंबेडकरी समाजही जयभीमसाठी मरण पत्कारयला तयार आहे. आम्ही माणसे नष्ट होऊ पण जयभीम कधीच नाहीसे होऊ देणार नाही. असे बाबू हरदास यांना उद्देशून कवी म्हणतात.

"मूलभूत गरजांपासून वंचित ठेवलं
तर विद्रोह करीन
महामानवांच्या पुतळ्यांची
विटंबना केली तर विद्रोह करीन
माणूस म्हणून जगू दिलं नाही
तर विद्रोह करीन."[6]

18-19 व्या शतकात माणसे असूनही माणसांची वागणूक मिळत नव्हती. हीन लेखायचे, दूर करायचे, आमची निंदा करायचे, अशातच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मास आले आणि आमचे जीवन उद्धारले. संविधानानी प्रत्येक मानव घटकाला अधिकार, हक्क दिले. त्याप्रमाणे जगण्याचा सर्वांना अधिकार आहे. तेव्हा माणसांच्या मूलभूत हक्कांपासून कुणासही दूर ठेवता येत नाही. दूर केले तर विद्रोह केल्याशिवाय शांत राहणार नाही. याप्रमाणे कोणत्याही महामानवांची, महापुरुषांची अवहेलना, विटंबना केले तर जगात आक्रमक होऊन विद्रोह करण्याची ताकद निर्माण झाली आहे. माणसाला माणसासारखे जगू दिले नाही तर पुन्हा विद्रोह कवी करणार आहेत. असे कवी या कवितेत म्हणतात.

"कुणाची किंमत लावताय साहेब ?

Research Hub International Journal

त्यांच्या वेदनांची,
नातेवाइकांच्या आसवांची
की तुमच्यातल्या माणुसकीची?
लवकर बोला साहेब !
मला आणखीही कामं आहेत... "[7]

वरील कविता ही कवींनी आलेल्या अनुभवावरून सुचली असावी. या व्यवस्थेने सर्व माणसांना हतबल केले आहे. योजना, सोयी व सवलती या कधीच माणसांपर्यंत पोहचत नाही. पद्मश्री नामदेव ढसाळ म्हणतात की, व्यवस्था ही रंडीसारखी आहे. त्याप्रमाणे या जमान्यात माणसांची किंमत नसून लाचारीचे जीवन जगणा-या लोकांची किंमत आहे असे कवी म्हणतात.

"तुमच्या हिताचं केलं
तर धर्माचं काम
तुमच्या मताचं केलं
तर पुण्याचं काम
आमच्या मताचं केलं
तर साला हराम ?"[8]

मानव हा समाजशील प्राणी आहे. माणसाला समाजात वापरावे लागते. पण इथला माणूस हा धर्म, रुढी, परंपरा, पाप व पुण्य आदीमध्ये अडकून राहतो. ही सारी थोतांडाची बाब माणसाला पोखरून टाकते. माणूस आतुन बरबटून गेला आहे. अशी कामे केली तर ते धर्माचे नाव पुढे करून चांगली समजून त्यांच्या हिताची वा उपयोगाची कामे केली तर हे पुण्याचे काम आहे असे म्हणून सांगत असतात. मग आपणही आपल्या मताची कार्य केली तर वाईट समजतात, हरामी म्हणतात तर आम्ही करायचे कसे ? असे कवी म्हणतात

"तू तुझ्या धर्माबद्दल बोल
मी माझ्या धम्माबद्दल सांगतो
तो रात्रभर प्रवचन देत राहिला
तांबडं फुटायला लागलं नि तो गप्प झाला
मजकडे पाहू लागला मी उगवत्या सूर्याकडे
पाहात म्हणालो,
'अत्त दीप भव'
आणि कामावर निघून गेलो.."[9]

सदर कवितेत धर्म व धम्म यातील काय फरक आहे याचे मनोमन दर्शन केले आहे. सनातनी लोकांना तुझ्याबद्दल बोल काय प्रेरणा देते तर मी माझ्या विज्ञानवादी, तत्त्वज्ञानी असणाऱ्या तथागतांच्या बौद्ध धम्माबद्दल सांगतो. धम्माचे गुणगान किंवा ज्ञान सांगण्यासाठी वेळ पुरणार नाही. कित्येक रात्र घालवल्या तरी कमीच आहेत. असे तत्त्वज्ञान सांगता सांगता रात्र निघाली तोजोमय दिवस उजाडला, स्वयं प्रकाश व्हा, असे सर्वांसाठी बोलून

मार्गक्रमण झालोय. असे कवी कवितेत म्हणतात.

**निष्कर्ष :**

1. संजय गोडघाटे यांच्या कवितेत आंबेडकरी जाणीवा दिसून येतात.
2. संजय गोडघाटे यांच्या कवीमध्ये बौध्ददर्शन प्रामुख्याने होताना दिसतात.
3. संजय गोडघाटे यांची कविता अस्वस्थ मनातील विचार मूल्य रुजविताना दिसते.
4. कवितेमध्ये विद्रोहाचे प्रतिबिंब जाणवत असल्याचे दिसतात.
5. आंबेडकरी वैचारिक तत्वज्ञान कवितेमध्ये आढळून येतात.
6. अनुभव विश्वातील प्रतिमाणे, प्रतीके उच्चतम असल्याचे दिसतात.
7. संजय गोडघाटे यांच्या कवितेत संवादात्मकता दिसून येतात.
8. उपरोध आणि उपहासाची सूत्रबद्ध मांडणी कवितेत केल्याची दिसून येतात.

**समारोप :**

कवी संजय गोडघाटे यांनी आपल्या कवितेमध्ये नवीन महत्वाचे विचार रुजविले आहेत. कविता या शस्त्राने विद्रोह कण्याची भाषा कवी कवितेत वापरतो. तथागत बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, आचार, प्रसार करण्याचे तंत्र या कवितेच्या रूपाने कवि उपीओहत आणले आहे. नव्वदोत्तरी कालखंडातील आंबेडकरी कवितेमध्ये आपल्या अनोख्या प्रतिभावंत शैलीने त्यांनी स्वतःचे स्थान सिद्ध केल्याचे दिसते आहे.

**संदर्भ टिपा :**


- उषाकिरण आत्राम (प्रस्तावना), हे असेच होत राहिले तर, ठसा प्रकाशन गृह, 09, अंबड रोड, नाशिक, पृ, 11.
- संजय गोडघाटे, वादळ, संवेदना प्रकाशन, नागपूर, 2010 पृ 22.
- संजय गोडघाटे, वादळ, संवेदना प्रकाशन, नागपूर, 2010 पृ 35.
- संजय गोडघाटे, लढा सुरूच ठेवावा लागेल, देवयानी प्रकाशन, मुंबई, 2012 पृ. 79.
- संजय गोडघाटे, लढा सुरूच ठेवावा लागेल, देवयानी प्रकाशन, मुंबई, 2012 पृ. 89.
- संजय गोडघाटे, अस्वस्थ काळ आणि माणूस, संवेदना प्रकाशन, नागपूर, 2016 पृ 31.
- संजय गोडघाटे, अस्वस्थ काळ आणि माणूस, संवेदना प्रकाशन, नागपूर, 2016 पृ.45.
- संजय गोडघाटे, हे असेच होत राहिले तर, ठसा प्रकाशन गृह, 09, अंबड रोड नाशिक, 2021 पृ. 32.
- संजय गोडघाटे, हे असेच होत राहिले तर, ठसा प्रकाशन गृह, 09, अंबड रोड नाशिक, 2021 पृ.78.


Research Hub International Journal